# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १५६ वा ❑ मंगळवार दि.०४ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## रेल्वेमध्ये धूम्रपानाची सर्रासपणे विक्री

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

ट्रेनमध्ये धूम्रपान करण्यास पूर्णपणे प्रतिबंधित आहे. यामध्ये सिगारेट, बिडी, चिल्लम किंवा कोणत्याही प्रकारचे धूम्रपान करणारे पदार्थ समाविष्ट आहेत. तसेच, ट्रेनमध्ये आगीची काडी पेटवणे किंवा कोणत्याही ज्वलनशील पदार्थाचा वापर करणे देखील प्रतिबंधित आहे. याशिवाय, रेल्वे कार्यालय किंवा स्टेशन परिसरात असे करणे देखील दंडनीय गुन्हा आहे आणि जर पकडले गेले तर एखाद्याला कारवाईला सामोरे जावे लागू शकते.कायदा असून देखील ट्रेनमध्ये सर्रासपणे धुम्रपान केले जाते...गुटखा, विडी सिगारेट विकल्या जातो.यासंबधी विरोध करणारा प्रश्न विचारणा कोणी नाही.रेल्वे स्टेशन परिसरात धूम्रपान करणे निषिद्ध असताना देखील ट्रेनमधील बोगीत व शौचालयात काही प्रवासी सर्रासपणे धुम्रपान करतात.

ट्रेनमध्ये धूम्रपान करण्याविरुद्ध काय कायदा आहे?

तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो

रेल्वे कायदा १९८९ च्या कलम १६७(१) नुसार, रेल्वे परिसरात आणि गाड्यांमध्ये धूम्रपान करण्यास मनाई आहे. याचे उल्लंघन केल्यास २०० रुपये दंड किंवा तीन वर्षांचा तुरुंगवास किंवा दोन्ही होऊ शकतात. ट्रेनमध्ये फटाके, गॅस सिलिंडर, पेट्रोल इत्यादी ज्वलनशील पदार्थ बाळगण्यास सक्त मनाई आहे. असे केल्याने दंड, शिक्षा किंवा दोन्ही होऊ शकतात. रेल्वे कायदा १९८९ च्या कलम १६४ नुसार, हा एक गुन्हा आहे, ज्यासाठी १००० रुपये दंड किंवा तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दोन्ही होऊ शकतात.

ट्रेन मध्ये विडी, सिगारेट, गुटका विकण्यास,बाळगण्यास प्रतिबंध असताना देखील हॉकर्स आरपीएफला चिरीमिरी देऊन ट्रेनमध्ये प्रवेश करतात.ट्रेनमध्ये या वस्तू विकण्यास सक्त मनाई असताना आर पी एफ थोड्या पैशांसाठी आपली ईमानदारी गहन ठेवून हॉकर्स ला ट्रेनमध्ये चढण्याला मूक संमती देतात..हॉकर्स व विक्रेते दामदुप्पट भावने,चढत्या भावने खुलेआम विक्री करतात. माझे दररोज ट्रेनी नी जाणे येणे असल्याने हा सर्व प्रकार मी गेल्या कित्येक दिवसांपासून बगत आहे.

एका सिगारेट व गुटखा विक्रेत्याला मी प्रश्न केला...तुम्ही हे सर्व पदार्थ ट्रेनमध्ये कसे काय विकता..तुम्हाला भीती वाटत नाही का? आर पी एफ पकडत नाही का? त्यावर तो म्हणाला,'' साहेब, दक्षिणा चढविल्या शिवाय आम्हाला ट्रेन मध्ये प्रवास मिळत नाही..ज्या ज्या स्टेशनवर आर पी एफ वाले भेटतात तेव्हा प्रत्येक वेळी १००/२०० रुपये त्यांना द्यावे लागते..शिवाय रेल्वे स्थानकावर वरील पोलिस स्टेशन अर्थात आर पी एफ स्टेशन वर प्रति महिना २०००/३००० रु द्यावे लागतात.. आर पी एफ एखाद्या वेळी केस बनवितात तर गुटखा, विडी व सिगारेट ची बनवित असून खाद्यपदार्थ विक्रीची बनवितात.'' मी म्हटल केस बनविल्यानंतर पुढे काय होते तर तो म्हणाला,वरेल्वे मॅजिस्ट्रेट समोर उभे केले जाते..५००/१००० रुपये दंड भरावा लागतो की दंड न भरल्यास ५/७ दिवस कैद होते..पण आम्ही दंड भरून मोकळे होतो..

परत आम्ही विक्रीस सज्ज होतो,.

प्रत्येक ठिकाणी चिरीमिरी देऊन तुम्हाला किती नफा मिळतो? इतका धोका पत्करून ट्रेन मध्ये विक्री करणे किती महागात पडते यावर तो म्हणाला,साहेब कायकरावे..पोटापाण्यासाठी कराव लागत.. आम्ही देखील दामदुप्पट किंमत प्रवाशांकडून वसूल करतो.

असे तो म्हणाला.

ट्रेन मध्ये विकणारे जेवढे दोषी त्यापेक्षा जास्त दोषी या विक्रेत्यांना क्षुल्लक पैश्यासाठी स्वतःच्या पेशाप्रती गद्दारी करणारे आर पी एफ व तत्सम अधिकारी देखील तितकेच जबाबदार आहे..अशा लाचखोर कर्मचाऱ्यांविरुद्ध व विक्रेत्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची गरज आहे

# पत्रकार आणि शाहीर एकाच नाण्याच्या दोन बाजू !

## चिरतरुण संघात डॉ. शेषराव पठाडे यांचे सप्रयोग व्याख्यान रंगले

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – पत्रकार आणि शाहीर या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. लोकमान्य टिळक यांनी लोकपत्रकारिता केली, तर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी शाहिरीच्या माध्यमातून लोकांचे प्रश्न जीवंतपणे मांडले. दोघेही भारतीय असंतोषाचे जनक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेषराव पठाडे यांनी रविवारी, ३ ऑगस्ट रोजी येथे केले.

चिरतरुण ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने आयोजित लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त कार्यक्रमात डॉ. पठाडे बोलत होते. अध्यक्षस्थानी चिरतरुण वॉकर्स क्लबचे अध्यक्ष शिवाजीराव रामरूले होते.

प्रारंभी चिरतरुणचे जेष्ठ सदस्य प्रा. डॉ. वि.ल. धारूरकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि प्रास्ताविकपर भाषण केले. ''भारत माते तुला वंदन करुनी'' या गणाने सुरुवात करून डॉ. पठाडे म्हणाले, महाराष्ट्रातील शाहिरी परंपरेचा वारसा समृद्ध आणि संपन्न आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या उभारणीत शाहिरांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. शाहीर अज्ञानदास उर्फ अगीनदास या शाहिराने प्रतापगडाचा पोवाडा रचला आणि मराठी भाषेत पोवाडा हा एक रोमांचकारी काव्यप्रकार म्हणून पुढे रूढ झाला. संशोधक य. न. केळकर यांनी ''ऐतिहासिक पोवाडे'' हा एक सखोल व विस्तीर्ण ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी शिवकाल तसेच पेशवाईतील ३०० पोवाड्यांचे एकत्रीकरण केले आहे. पोवाडा सादर करताना शाहीर कथानकात एवढे एकरूप होतात की, सभोवतीचे वीरश्रीयुक्त युद्धाचे हुबेहूब वर्णन करून त्यातील बारकावे स्पष्ट करतात. शाहिरांची शब्दकळा, त्यांची देहबोली, आरोह-अवरोह एवढे जबरदस्त असतात की, घटनांचे हुबेहूब चित्र ते नजरेसमोर उभे करतात, हे स्पष्ट करताना शाहीर-पत्रकार डॉ. पठाडे यांनी शाहीर अगीनदास यांचा अफजल खानाच्या



वधा चा पोवाडा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची ''माझी मैना'' ही पोवाडेवजा छक्कड आणि लावणीसम्राट ज्ञानोबा उत्पात यांची ''वाटलं होतं तुम्ही याल...'' या शृंगारिक लावणीचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेल्या लावणीतील सौंदर्य स्थळे त्यांनी स्पष्ट केली. ''माझी मैना गावाकडे राहिली'' ही लावणी तर त्यांनी इतक्या प्रभावीपणे सादर केली की, रसिकांनी टाळ्या देऊन त्यांना दाद दिली. उत्तर पेशवाईतील पठ्ठे बापूराव यांच्या काव्य लेखनाची आणि लावणीची ठळक वैशिष्ट्ये सांगून डॉ. पठाडे यांनी बैठकीतील लावणी व फडातील लावणी यातील मौलिक फरक स्पष्ट केला आणि लावणी हा कलाप्रकार मराठी लोकसंस्कृतीचा कसा अविभाज्य भाग बनला आहे, हे स्पष्ट केले. महाराष्ट्रातील लावणीच्या विकासाचा आढावा घेत त्यांनी लोकनाट्य आणि वगनाट्य यातील बारकावेही स्पष्ट केले . शाहीर साबळे, दादा कोंडके यांच्या लोकनाट्यावरही त्यांनी प्रकाश टाकला. पोवाडा, लावणी आणि अभंग यातील परस्पर संबंध उधृत करून आपल्या सप्रयोग व्याख्यानात त्यांनी रंग भरले.

अण्णा भाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत केलेले कार्य इतिहासाला कलाटणी देणारे ठरले आहे. प्रामुख्याने अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख, द.ना. गव्हाणकर यांच्या कार्यावर त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे आयोजन चिरतरुणचे संघटक विजय जोग यांनी केले, तर अनंत पवार यांनी कार्यक्रमाचे उत्तम प्रकारे व्यवस्थापन केले. यावेळी विजय जोग यांनी ''दिवाळी पहाट'' या कार्यक्रमातही शाहिरी आणि लोककला यावर एक सत्र आयोजित करण्याचा मनोदय व्यक्त केला. कार्यकारी अध्यक्ष बाळासाहेब राऊत यांनी सूत्रसंचालन करून सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी डॉ. शिवाजी धनवले, उत्तमराव पवार, गणेश महाजन, रमाकांत शिंदे, जयकुमार भोईरकर, राजाराम साळवे, भारत चौधरी, कासारे पाटील, देठे, इंगळे आदींसह सिडको एन-२ परिसरातील रसिक आणि वॉकर क्लबचे सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

# रानकवी नामदेव धोंडो महानोर

ज्योतिर्मय साहित्य



विदर्भातील दूर असलेल्या जळगाव जिल्ह्यातील पळसखेड येथे जन्मलेले नामदेव धोंडो महानोर यांनी आपल्या आयुष्यात शेतीभातीची गाणी लिहिली. मातीची व्यथा मांडणारे कवी म्हणून त्यांनी जीवन व्यतित केले. पळसखेड येथेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतल्यावर जळगावच्या मूळजी जेठा महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. त्याआधी वयाच्या दहाव्या वर्षी शेंदुर्णी गावात त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण झाले.

घरची अत्यंत गरिबी असल्याने महाविद्यालयाची फी भरणे शक्य न झाल्याने त्यांनी एका वर्षातच शिक्षण सोडले. त्यांची प्रतिभा खूप महान असल्याने त्यांनी खूप गीते लिहिली. सहज सोप्या शब्दात लेखन त्यांनी केले. जोंधळ्याचे भरघोस पीक पाहून जोंधळ्याला चांदणे लखडून यावे अशी शब्दरचना केली.

१९७९ व १९९० मध्ये त्यांची महाराष्ट्र विधानपरिषदेवर राज्यपाल नियुक्त आमदार म्हणून नियुक्ती केली होती. निसर्गकवी असा त्यांचा लौकिक होता. निसर्गकवितांमुळे त्यांना रानकवी म्हणून ओळखले जाते.

१६ सप्टेंबर १९४२ रोजी हा हिरा जन्मला. पदवीपर्यंतही शिक्षण झाले नव्हते तरी महाराष्ट्रातील विशेषतः विदर्भातील शेतीचे दुःख त्यांनी जाणले होते. १९९१ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा किताब दिला होता. कवी असले तरी गीतकार म्हणून त्यांची प्रतिभा विशेष होती.

जैत रे जैत चित्रपटातील सर्वच गीते गाजली व लोकप्रिय झाली, त्यांनी गद्यलेखन केले असले तरी ते रानकवी म्हणूनच प्रसिध्द झाले, त्यांची गांधारी ही कादंबरी आहे. पण तीकडे फारसे कुणाचे लक्ष गेले नाही. गपसप (१९७२) आणि गावातल्या गोष्टी हे लोककथासंग्रह त्यांनी प्रसिध्द केले. पळसखेडची गाणी या नावाने त्यांनी लोकगीतांचे संकलनही प्रकाशित केले. त्यांच्या रानकविता दूरदेशी गाजल्या आहेत.

मी रात टाकली, लिंबोणीचं लिंबू, दूरच्या रानात केळीच्या बनात, बाळगू कशाला व्यर्थ कुणाची भीती गं. आम्ही ठाकरं ठाकरं ही गीते लोकप्रिय झाली. ही अजरामर गीते आजही नव्या पिढीलाही आकर्षित करतात. जांभूळ पिकल्या झाडाखाली आणि राजसा जवळी जरा बसा ही गीते खेड्यातील व शहरातील रसिकांनाही आवडतात. ते ती गुणगुणतात.

विधानसभेत त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, ठिबक सिंचन, फळबागा आणि तंत्रज्ञानविषयक प्रश्न त्यांनी मांडले. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी त्यांनी मुद्देसूद भाषणे केली.

त्यांची अजिंठा ही दीर्घ कविता सर्वदूर गाजली. कापूस (खोडवा) ही शेतीविषयक कविता आहे. गंगा वाहू दे निर्मळ हा कवितासंग्रह नदीतील प्रदूषणाचा प्रश्न मांडणारी आहे. रानातल्या कविता त्यांनी लिहिल्या. एक होता विदूषक, अबोली, सर्जा, मुक्ता हे त्यांच्या चित्रपटगीताने सजलेले चित्रपट. सोमनाथ दडस यांनी त्यांची काव्यसृष्टी व प्रतिमासृष्टी हे ग्रंथ त्यांच्या जीवनकार्याची माहिती देतात. जागतिक चित्रपट महोत्सवात त्यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे.

२०१२ मध्ये भरलेल्या पर्यावरण प्रेमी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. नंदूरबार येथे भरलेल्या पहिला जिल्हा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. २०१५ मध्ये त्यांना यशवंतराव स्मृती समितीने भगवानराव लोमटे स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविले आहे.


अभिवादन...


प्रकाश रामचंद्र क्षीरसागर

९०११०८२२९९














# जात्यावरच्या ओव्या......


पुरणाची पोळी
लाटते घाई घाई
जेवून जाय दादा,
रागं भरन माय बाई ||१८९||

मला दळू लागे
दिलाची दिल प्यारी
केसार्‍या कवळ्या
हिच्या दंडा भुजावरी ||१९०||

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# तात्या आणि सोमनाथ ...
## (माझ्या चांदणेशब्द फुलांचे या पुस्तकातील लेख)

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२


ज्योतिर्मय साहित्य

आल्यापासून तात्या कामाला जी सुरुवात करीत ती न थकता ते सतत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत करत असत. आल्यावर एकदा आणि एकदा चार वाजता असे दोनच वेळा ते चहा घेत घ्यायचे. तोही त्यांना दिला तर ! त्यांची मागणी नसायची. दुपारी एक दीडच्या सुमारास सगळे कारागीर जेवण करत आणि काही वेळ विश्रांती घेत असताना तात्या काहीतरी काम करीत असत. मी त्यांना विचारलं, तात्या, तुम्ही जेवत नाही का ? तात्या हसतमुखाने उत्तर देत, सर, मी एकवेळच जेवण करतो. सकाळी घरून निघताना थोडा नाश्ता करून निघतो. मग काही खात नाही. मी जर दुपारी जेवलो तर माझ्याने काम होणार नाही. आपलं काम संपवून घरी गेल्यावर संध्याकाळी अंघोळ वगैरे करून तात्या जेवण घेत असत.



मला सोमनाथ मिस्त्री, तात्या यांच्यासारख्या कष्ट करून प्रामाणिकपणे उदरनिर्वाह करणाऱ्या व्यक्तींबद्दल नेहमीच आदर वाटत आला आहे. मी अशा लोकांशी सलगी करून त्यांच्या अंतरंगात डोकावण्याचा प्रयत्न करत असतो. त्यातून माणसं मला कळत जातात. पाणबुड्याने समुद्रात डुबकी मारून कधी कधी त्याच्या हाताला मोती लागावे तसे काही अनमोल मोती हाती लागतात. कधी कधी जगण्याचं रहस्यही उलगडतं. त्यांच्या वागण्याबोलण्यातून असा एखादा संदेश ही मंडळी नकळत देऊन जातात की शाळा कॉलेजातील शिक्षण फिके पडावे. कोणाकडून काय शिकायला मिळेल ते सांगता येत नाही. आपले डोळे, कान मात्र उघडे असावेत. तात्या काम करीत असताना मी निरीक्षण करीत असे. तात्या प्रत्येक गोष्ट अत्यंत काळजीपूर्वक करीत. दोन दोन वेळा मोजमाप घेणे, त्यांना जे साहित्य वापरायचे त्याची काळजीपूर्वक पाहणी करून घेणे, उत्तम असेल ते वापरणे अशी त्यांच्या कामाची पद्धत होती. किचन ओट्यावरच्या टाईल्स बसवताना आपल्या कामातील तात्यांची एकाग्रता मी पाहिली. बाहेरच्या भिंतीला ढोलपुरी टाईल्स बसवताना त्यांनी त्याच एकाग्रतेने काम केले. कुठेही त्यांनी आपल्या कामाच्या दर्जाशी तडजोड केली नाही. किचन ओट्याला ग्रॅनाईट बसवताना त्यांनी ज्या तन्मयतेने काम केले ते पाहून मी थक्क झालो. तो ग्रॅनाइटचा दगड घासताना त्यांनी त्यावर अनेक तास घालवले. एक डोळा बारीक करून तो ग्रॅनाईट ते प्रत्येक बाजून बघत असत. शिवाय वेळोवेळी त्यावर हात फिरवून तो अपेक्षित तेवढा गुळगुळीत झाला आहे ना याची ते खात्री करून घेत. या वेळी तात्यांना असं असं करा म्हणून सांगणारं कोणी नव्हतं. **(क्रमशः)**

## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# उपदेशलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

सहा चक्रे

मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि सहस्त्रदल,

प्राण व अपान यांचे मिलन करून सुषुम्ना नावाच्या कण्यांतील सुक्ष्म नाडीच्या मार्गाने प्रत्येक चक्राचे भेदन करून प्राण मूर्ध्नि आकाशात न्यावयाचा असतो.

अजपाजय - माणूस जीवंत असेपर्यंत त्याचा श्वासोच्छ्वास अखंड चालू असतो. तो आपोआप होणारा जप आहे. श्वास आत घेताना सो व श्वास बाहेर सोडताना हम् असा सूक्ष्म नाद होतो,त्या नादावर मन एकाग्र केलें तर चोवीसतास विनासायास जप चालतो. त्यालाच अजपाजप म्हणतात.

सगुणसाकारभक्ति, निर्गुणनिराकार भक्ति, तिर्थाटन, करावे असे सांगतात.


कोणी शक्तिमार्ग सांगतात देवीची उपासना करण्याचा मार्ग,

आत्मज्ञानावाचून उपदेशाचे सर्व प्रकार व्यर्थ आहेत. आत्मज्ञानासारखे पावित्र्य दुसऱ्या कशातचं नाही. म्हणून आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावे. सर्वात श्रेष्ठ आत्मज्ञानाचा उपदेश आहे. हे विसरू नये.

माणूस कोणत्याही वर्णाचा असो त्याच्या अंगी जर आत्मज्ञान स्थिरावले तर या जगात तो जन्मोजन्मी परमात्म्याचा दास होतो.

उपदेशनाम समास ४ था समाप्त
श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ

# संतांचा सहवास । याहून भाग्य नाही दुसरे खास ॥



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

बाह्य प्रपंच प्रारब्ध उपाधि । त्यांसी त्रासू नये कधी । हीच जाणावी उघड समाधि ।। सावली मातीत पडली । तिला धुऊन नाही घेतली । तसेच खरे आहे देहाचे । पण ते संतांनाच साधे ।। सर्व संकल्प वर्ज्य करून । अवस्था असावी बालकवृत्तिसमान ।। सतत विवेक अखंड चित्ती । रामनामी मनोवृत्ति । हेचि तुम्हा परमप्राप्ति ।। मारुनी खोटी कल्पनावृत्ति । रामनाम अखंड चित्ती । समाधान संतोष शांति ।। देवासी सर्व करी अर्पण । करी स्वानंदयुक्त परमात्मचिंतन । हीच सिद्ध साधूची खूण ।। वासना जाळून शुद्ध चित्त । अहंभाव सोडून होई निभ्रांत ।। आता मी रामाचा, राम माझा । हे जाणावे पूर्ण ।।

संतसहवास त्याला पाही । जो देहबुद्धि टाकून राही ।। संतास न पाहावे देहात । आपण देहापरते होऊन पाहावे त्यास ।। नामात ठेवा प्रेम । हीच संतांची खूण ।। जे जे आपले संगती आले। संताने त्यांचे सार्थकच केले ।। साधूने देह ठेवला । तरी सत्तेने जागृत राहिला ।। त्याची ठेवावी आठवण । सेवा करावी रात्रंदिन ।। संतांचा सहवास । याहून भाग्य नाही दुसरे खास ।। संतचरणी विश्वास । त्याने भगवंत जोडला खास ।। लक्ष ठेवावे संताकडे । देह लावावा प्रपंचाकडे।। नाम घ्यावे श्वासोच्छ्वास । संत संतुष्ट होईल खास ।। सांगावे संतास नमस्कार । जो जगताचा आधार । संताच्या देहाची प्रारब्धगति संपली । काया आज दिसेनाशी झाली। परि अजरामर राहिली ।। राम कर्ता हे जाणून चित्तीं । जगात संत ऐसे वर्तती । जेणे दुसऱ्यास मार्गदर्शक होती।। संतांचे करावे अनुकरण । घ्यावे त्यांचे दर्शन । सांगावे आलो आहे आपण । विचाराव्या कठिण वाटा। जेणे सुलभ होईल व्यवहारी चालता ।। रामापरता नाही लाभ । हे धरले ज्याने चित्ती । त्यास लाभली खरी संतांची संगति ।। त्यांचा आदर्श ठेवावा पुढे । कधी न होईल वाकडे ।। स्वत:चे पावावे समाधान । त्याने लोकांस आणण्याचा प्रयत्न करावा जाण ।। संताशी व्हावे अनन्य शरण । दुसरीकडे जाण्याचे नाही कारण ।। भाग्याने संत घरी आला । अभागी न मानी त्याला ।। सूर्याचा प्रकाश झाला । आंधळ्याला उपयोगी नाही आला । तैसी विषयी झाली ज्याची वृत्ति । संताची संगत त्याला न लाभती ।। रामनामावाचून ज्याचा वेळ जात नाही । तोच जीवन्मुक्त पाही ।। देहाचे ठिकाणी विरक्त । विषयाचे ठिकाणी नसे अहंममत्व । त्यालाच म्हणतात मुक्त ।।

रामापरते न मानावे हित। हे सर्व संतांचे मनोगत ।।

***

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दुःख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू

मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दुःख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दुःखाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दुःखाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरी माऊली

***

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

१४. माहूरमहात्म्य
व्रतनेम ज्याचा येणे मातापूर तीर्थ
न जाय तयाचा जन्म हा व्यर्थ।।
दाखवा हो कोणी भोगितो जो कष्ट
सांगोनी रेणुकेला आपुले आर्त्त।।
संपती सर्वापदांचे आक्रांत गर्त
चंद्रहास वदतसे अनुभवा यथार्थ।।
१५. अंबानाम-महात्म्य
न लागे करणे सुवर्णदानधर्म
ओळखिजे जरी अंबानाम-मर्म।।
घालोनी हळुवारी फुंकर सप्रेम
अंबा दूर करी संकटांचे घर्म।।
स्नेहादरे नित्य घेई जो नाम
त्यासी न लगे करणे दुजे कर्म।।
चंद्रहास म्हणे घेयावे नाम
त्यासी नाही दुसरा धर्माधर्म।।



## आरोग्य संजीवनी

# हळदीच्या सेवनाने झपाट्याने कमी होईल खराब कोलेस्ट्रॉल?

ज्योतिर्मय साहित्य

प्राचीन काळापासून हळदीचा वापर आरोग्यासाठी केला जातो. कोलेस्ट्रॉलच्या समस्येवरही हळद उपयुक्त ठरू शकते. फक्त वापरण्याची पद्धत एकदा जाणून घ्या

हळद आपल्याला प्रत्येक घरामध्ये पाहायला मिळते. हळदीचा वापर सामान्यतः घरांमध्ये जेवण चवदार बनवण्यासाठी केला जातो. त्वचेचे सौंदर्य वाढवण्यापासून ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी हळद खूप फायदेशीर आहे. हळदीचा वापर प्राचीन काळापासून संसर्ग, जखम आणि पोटाच्या समस्यांसाठी केला जातो. हळद हा अनेक पोषक तत्वांनी समृद्ध आहे जी कर्करोग आणि मधुमेह यांसारख्या रोगांवर उपचार करण्यास मदत करते. हळदीचे आरोग्यदायी फायदे बाजारात सहज उपलब्ध आहेत आणि ती विविध प्रकारे वापरली जाऊ शकते. हळद रक्तातील कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवून हृदय निरोगी ठेवण्यास देखील मदत करू शकते. चला जाणून घेऊया हळदीचे सेवन कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यासाठी कसे उपयुक्त ठरते ?

**हृदयविकारात फायदेशीर**

शरीरात उच्च कोलेस्ट्रॉल म्हणजे तुम्हाला हृदयविकाराच्या झटक्यापासून स्ट्रोकपर्यंत कोणत्याही गोष्टीचा धोका असू शकतो. अशा परिस्थितीत हळदीसोबत कोलेस्टेरॉलची पातळी राखण्यासाठी वेळोवेळी अनेक अभ्यास आणि संशोधन केले गेले आहेत. प्राणी आणि मानवांवर केलेल्या संशोधनानुसार हळदीचे सेवन केल्याने रक्तातील कोलेस्टेरॉलच्या पातळीवर तीन प्रकारे परिणाम होतो.

१) कोलेस्टेरॉलची पातळी कमी करणे...

लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन म्हणजेच कोलेस्टेरॉलला वाईट कोलेस्ट्रॉल म्हणतात आणि त्यामुळे हृदयाच्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. हळदीचे सेवन केल्याने एलडीएल कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते आणि शरीरातील चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते, ज्यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

२) ऑक्सिडेशनपासून एलडीएल कोलेस्टेरॉलचे संरक्षण

एथेरोस्क्लेरोसिस तेव्हा होतो जेव्हा एलडीएल कोलेस्टेरॉल ऑक्सिजनसह प्रतिक्रिया देते, ज्यामुळे रक्ताभिसरणात अडथळा येऊ शकतो. हळदीचे सेवन केल्याने हे ऑक्सिडेशन थांबते, त्यामुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते आणि रक्तवाहिन्याही निरोगी राहतात.

३) ट्रायग्लिसराइड पातळी कमी करणे

उच्च रक्तातील कोलेस्टेरॉलसह उच्च ट्रायग्लिसराइड पातळी हृदयाच्या आरोग्यास धोका निर्माण करू शकते. ट्रायग्लिसराइड देखील धमन्यांमध्ये तयार होते, ज्यामुळे कोलेस्टेरॉल रक्ताभिसरण समस्या निर्माण करणे सोपे होते. हळदीच्या वापराने ट्रायग्लिसराइडचे प्रमाण नियंत्रित करता येते.

हळदीमध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात. खराब कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी रोज भाज्यांमध्ये हळदीचा वापर करावा. तसेच रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास दुधात चिमूटभर हळद टाकून प्यावे. याशिवाय रोज एक कप ग्रीन टी प्यायल्याने उच्च कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते.

**(क्रमशः)**

# ॥ श्री राम कथा ॥



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

वाल्मिकिनी कुश लव यांना अयोध्येत जाऊन रामायण गायन करा असे सांगितले. ते कोणत्या राग दारीत करा हे सांगितले.तेंव्हा सर्वांना संस्कृत कळायचे,रामायण श्लोक रूपात संस्कृत मधूनच श्लोक रुपात असल्यामुळे त्यानी ते गायले. रामानी कुश लव यांना आपल्या महालात निमंत्रित केले. पण कोणाच्या घरी जाऊ नका. मोबदला म्हणून द्रव्य घेऊ नका असे वाल्मिकींनी सांगून ठेवलेले असल्यामुळे रामांनी देऊ केलेले द्रव्य त्यांनी घेण्यास नकार दिला.

अयोध्या ही भक्तीची नगरी आहे,मिथिला ही कर्माची नगरी आहे. अ योध्या मनु निर्मित नगरी आहे. इथे अपमृत्यु होत नसत, कोणासही वैधव्य प्राप्त होत नसे, चोरी मारी नसे.कृत युगात स्त्री पुरुष संबंध आहे,संतान प्राप्ती आहे पण कृत युगात स्त्रीचे कौमार्य भंग पावत नसे.

एका व्यक्तीने एक शेत विकत घेतले आणि तो त्या शेतात नांगरणी करू लागला त्याला नांगरणी करताना शेतात एक सोन्याच्या मोहरांचा हंडा सापडला. तो त्याने आधीच्या मालकास देऊ केला. तो आधीचा मालक म्हणे ही जमीन मी, त्यातील वृक्ष ,माती सर्वा सहित विकली आहे त्यातून मिळालेले धन आता तुझे झाले.. दोघेही मला नको,मला नको म्हणून भांडायला लागले. ते रामाकडे गेले . रामास ते धन तुम्ही ठेऊन घ्या म्हणू लागले.राम म्हणाले माझ्या कोशात आधीच धन ठेवायला जागा नाही, मलाही नको. मग ते धन अयोध्येच्या चौकात ठेवले गेले व जाहीर केले की ज्याला कोणाला गरज असेल त्याने ते न्यावे.राम राज्यावर असे तोवर त्या धनास कोणीही स्पर्शही केला नाही.ते राम राज्य होते. **(क्रमशः)**

## फुलमाला....





शेवंती...

मनमोहक सुगंध हीचा
विविध रंगात फुलती
सर्वांसाठी उमलते जणू
प्रसन्न,प्रफुल्ल ही शेवंती

केशसंभारात दिसे छान
सजावटीची असे शान
देव मूर्तीवर शोभायमान
शुभ कार्यात हिला सन्मान

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### कर्मयोगी रवींद्रनाथ

आणि त्यांनी विनोद दांना शांतीनिकेतनमध्ये प्रवेश दिला. गुरुदेवांच्या परिस स्पर्शाने त्यांच्यामधील चित्रकार, मूर्तिकार, शिल्पकार घडत गेला. आपल्या वयाच्या अखेरीपर्यंत विनोद दा कार्यरत राहिले. सुंदर चित्रे त्यांनी काढली, अनेक म्युरल्स निर्माण केली, सुंदर मूर्ती घडवल्या. अनेक विद्यार्थी त्यांनी घडवले.

अनेक विद्यार्थ्यांचे ते आदर्श झाले. अनेकांचे प्रेरणास्थान ठरले.

गुरुदेवांच्या मार्गदर्शनातून घडलेली आणखी एक अशीच व्यक्ती म्हणजे विनायकराव मसोजी. हे विनायकराव मसोजी मुळचे आपल्या महाराष्ट्रातील कोल्हापूरचे. लहानपणापासूनच त्यांना चित्रकलेत गती होती. त्यांच्या आईवडिलांनी त्यांना मुंबईतील जे जे स्कूल ऑफ आर्टमध्ये दाखल केले परंतु तेथील पाश्चात्त्य पद्धतीच्या धाटणीचे शिक्षण त्यांना पसंत पडले नाही. त्यानंतर ते पुढील शिक्षणासाठी शांतिनिकेतनमध्ये गेले. तिथे त्यांचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने विकसित झाले. त्या ठिकाणी तेथील प्रसिद्ध चित्रकार नंदलाल बोस यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले जोडीला गुरुदेवांचे मार्गदर्शन होतेच. या ठिकाणी विनायकरावातील उत्तम चित्रकार तर घडलाच पण धातूकला,

एम्बॉसिंग, वूडकट आदी अनेक प्रकार ते शिकले. इसराज या नावाचे वाद्य वाजवायला ते शिकले. शांतिनिकेतनमधील अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्यांचं सहभाग असायचा. आपल्या आयुष्यातील तीन दशके ते शांतीनिकेतनमध्ये कार्यरत होते. आधी शिक्षक म्हणून नंतर उपप्राचार्य आणि नंतर प्राचार्य म्हणून त्यांनी मोठी कामगिरी केली. पुढे ते नागपूर येथे स्थायिक झाले.

विनायकराव मसोजी यांच्याप्रमाणेच गुरुदेवांचे प्रेम आणि मार्गदर्शन लाभलेले महाराष्ट्रातील दुसरे व्यक्तिमत्व म्हणजे संगीताचार्य भीमराव हसुरकर शास्त्री. त्यांनी ग्वाल्हेरच्या गंधर्व महाविद्यालयातून संगीताचे शिक्षण घेतले. पुढे ते शांतिनिकेतन मध्ये स्थायिक झाले आणि तेथे त्यांनी एक प्रतिभा संपन्न संगीत शिक्षक म्हणून लौकिक प्राप्त केला. विद्यार्थ्यांना ते रवींद्र संगीत शिकवत असत. बंगाली विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी त्यांनी बंगाली लिपीत लिहिलेल्या हिंदी गीतांचे दोन खंड संपादित केले.

दीनबंधू सी एफ अँड्रयुज इंग्लंडमधून भारतात आले होते. परंतु भारतीय संस्कृतीशी एकरूप झाले होते. स्वातंत्र्यसंग्रामातही त्यांचा सहभाग होता. महात्मा गांधींशी त्यांची एवढी जवळीक होती की त्यांना मोहन या नावाने हाक मारणारे ते एकमेव होते. ते महात्मा गांधीजी आणि गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्यातील दुवा होते अत्यंत सेवाभावी असे त्यांचे व्यक्तिमत्व शांतीनिकेतन मधील विद्यार्थ्यांना ते इंग्रजी शिकवत. गुरुदेवांचे वृद्ध बंधू द्विजेंद्रनाथ म्हणून शांतिनिकेतनात राहत होते. अँड्र्यूज त्यांना रिक्षेत बसवून स्वतः रिक्षा ओढायचे आणि शांतिनिकेतनात फिरवून आणायचे.

आपल्या सर्व सहकाऱ्यांबद्दल गुरुदेव फार आदराने आणि प्रेमाने लिहितात. नंदलाल बाबू त्यांना सगळेजण मास्टरमोशाय म्हणत, शिवाय नेपाळचंद्र राय, जगदानंद बाबू, काली मोहन बाबू ,भीमराव शास्त्री हे सगळे त्यांचे सहकारी. **(क्रमशः)**






# गुरु : ईश्वराहून मोठे स्थान

ज्योतिर्मय साहित्य

माणसाच्या जीवनामध्ये गुरुचे स्थान अत्यंत महत्त्वाचं आहे. आपल्या दृष्टीने गुरु ला ईश्वराहून मोठं म्हटलं तरी चालेल. ईश्वर प्रत्येक ठिकाणी असतो परंतु तो तितक्या जीवांना समजतो ? प्रत्येक जीवातला सृष्टीतला, निसर्गाच्या प्रत्येक कणाकणात वसलेला ईश्वर समजून देण्याचं आणि त्याच्या पर्यंत पोहोचवण्याचं महत्त्वाचं कार्य गुरु करत असतात.

जो आपल्याहून अधिक बुद्धिमान,अनुभवी,समजदार, काहीतरी जास्त येणारा असा जो कोणीतरी सतत आपल्या कृतीतून वक्तव्यातून, कळकळीची विनंती करतो व इतरांना त्या बाबतीत सुधारण्याचा प्रयत्न करत असतो तोच तर गुरू असतो.

साधारणपणे आपण सुरुवातीला आई-वडिलांकडून, घरातील मोठ्या व्यक्तींकडून, समाजातील वयस्कर व्यक्तींकडून आणि शाळेतील शिक्षकांकडून काही तरी सतत शिकत असतो. तर काही व्यक्ती मात्र विशिष्ट विषयांची शिकवण देत असतात.

शिक्षण उद्देशाच्या दृष्टीने गुरु दोन प्रकारचे म्हणावे लागतील.

१: लौकिक गुरु : आई-वडील, शिक्षक आणि इतर. जगण्याचे नैतिक नियम शिकवणारे, आपल्यात सतत काही ना काही सुधारणा करणारे. भौतिकतेच्या विषयात व संसारासंबंधी जगण्याशी निगडित गोष्टी शिकवणारे त्यांनाही पर्यायाने गुरु म्हणावे लागेल.

२: लोकोत्तर गुरु : आध्यात्मिक शिक्षण देणारे, स्वतः साधनेमध्ये असून इतरांना साधना आदर्श, प्रशिक्षण देणारे, धर्माचे अनुकरण करत धर्माचा प्रसार करणारे, मुक्ती मार्गाचा स्वतः उद्देश धारण करून इतरांना त्या मार्गावर प्रवृत्त करणारे. अशा सर्व साधू संत प्रवर्तक महात्म्यांना गुरु म्हणतात.

आपल्याला सर्व काही समजतं असे नव्हे. ते जसं आहे तसं किंवा असेल तसं आणि त्याचे सत्य स्वरूप समजण्यासाठी गुरुची आवश्यकता असते. आपल्यामध्ये ज्ञान असतं परंतु ते निमित्ताने प्रगट होण्यास स्पष्ट होण्यास गुरुचे मोलाचे योगदान असते. *दिवा असतो, वात असते, तेल असते परंतु त्याला प्रज्वलित करणारा कोणीतरी असावा लागतो. तोच तो गुरु.




मराठीत म्हटलं आहे ज्याच्या जीवनात गुरु त्याचे जीवन खऱ्या अर्थाने सुरू.

आपल्या जीवनाच्या उद्देशानुसार आपण गुरुची निवड केली पाहिजे. गुरु मध्येही उत्कृष्ट गुरु असतात. हिंदीमध्ये म्हणतात ;

पानी पीजे छान के
गुरु कीजे जान के

अर्थात् : यांच्याकडून आयुष्याचे जगण्याचे आणि मुक्तीचे तत्वज्ञान घ्यायचे आहे , ज्यांच्या मार्गाचे अनुसरण करायचे आहे, ज्यांच्या मागे मागे चालायचे आहे; तो गुरु देखील आपण योग्य असा निवडला पाहिजे. तर या ठिकाणी उत्कृष्ट गुरु कोणास म्हणावे मूळ शास्त्रात याचा उल्लेख आढळतो :

सर्वश्रेष्ठ सर्वोत्तम गुरु : जो
१ वितराग : राग द्वेषाने रहित
२ सर्वज्ञ : ज्ञानी संपूर्ण
३ हितोपदेशी शास्त्राचा कर्ता सर्व जीवांना कल्याणकारी मार्ग दर्शवणारा असा आहे.

आपल्या जीवनाचा सर्वांगीण सुधार करत मुख्य उद्देशाकडे नेऊन पोहोचवणाऱ्या गुरुबद्दल आपल्याला सतत आदर व भक्ती भाव असला पाहिजे. गुरुच्या वचनावर इतकी श्रद्धा असायला हवी की “ *गुरुचा शब्द आदेश आणि वाक्य प्रमाण “* असेच मानावे.

एकदा का गुरु जाणला, मानला की त्या आदरणीय गुरूंचे आपल्याकडे सतत लक्ष असते. ते आपल्यासमोर असोत अथवा नसोत, ते जवळ असोत अथवा दूर असोत, ते विद्यमान असोत आठवा निर्वाण स्थानी पोहोचलेले असोत. असतील तेथून गुरूंचे आपल्यावर सतत लक्ष असते. म्हणून वेळ संकटाची असो नसो, वेळ आनंदाची दुःखाची कुठलीही असेल ; वेळोवेळी आठवेल तेव्हा, शक्य होईल तेव्हा गुरुचे नामस्मरण करावे. एक अद्भुत शक्ती आपल्या सोबत असल्याचा अनुभव होईल.


म्हणून जीवनामध्ये गुरुचे स्थान ईश्वराहून देखील महत्त्वाचे आहे असेच मला वाटते. जय गुरुदेव

# कहाणी शुक्रवारची... देवीची...

ज्योतिर्मय साहित्य

आटपाट नगरात एक दरिद्री ब्राम्हणाची बायको रहात असते.. ती आपल्या गरिबीचे गाऱ्हाणे शेजारणीला सांगते.. ती तिला शुक्रवारच्या देवीचे व्रत करायला सांगते..श्रावण शुक्रवारी हे व्रत सुरू करावे.सारा दिवस उपवास करावा, संध्याकाळी एका सवाष्णीला घरी बोलवावे, तिचे पाय धुवून हळदी कुंकू लावून दूध साखर, भाजके हरभरे (फुटाणे) द्यावे, ओटी भरावी मग आपण जेवावे असे वर्षभर करावे मग उद्यापन करावे असे सांगते. तिचे ऐकून ही ते व्रत नियमित करू लागते.

त्याच गावात तिचा भाऊ रहात असतो, तो सहस्त्र भोजन घालण्याचे ठरवितो पण ही गरीब म्हणून हिला काही जेवायला बोलावत नाही..पण ही मनात म्हणते भाऊ विसरला असेल आपण जाऊ.. एक दिवस उपास चुकेल, मुलांना जेवायला मिळेल..पण त्या दिवशी भाऊ पंक्तीत तूप वाढायला येतो आणि न बोलावता ती आली म्हणून तिचा अपमान करतो,दुसऱ्या दिवशी परत तिची मुले हट्ट करू लागतात म्हणून ती त्यांना घेऊन परत भावाकडे जेवायला जाते त्या दिवशी तिला भाऊ म्हणतो इतके सांगून आलीस का परत डुकरीणीसारखी मुलांना घेऊन.. उद्या परत आलीस तर हाकलून देईन.. आणि तरीही ती तिसऱ्या दिवशी जाते त्यावेळी तिचा भाऊ तिला भर पंक्तीतून अपमान करून हाकलून लावतो..




देवीला तिची दया येते आणि दिवसेंदिवस हिची परिस्थिती सुधारते. वर्षभरानंतर ती करत असलेल्या व्रताचे उद्यापन करायचे ठरविते आणि त्यासाठी भावाला जेवायला बोलावते.. भाऊ मनातून ओशाळा होतो..बहिणीला म्हणतो ताई ताई तू उद्या माझ्या घरी जेवायला ये नाहीतरी मी तुझ्या घरी येणार नाही..बहीण भावाच्या मनातले कारण जाणते आणि दुसरे दिवशी पैठणी नेसून शालजोडी, दाग दागिने घालून भावाच्या घरी जेवायला जाते..या वेळी मात्र भाऊ तिचे आदरातिथ्य उत्तम करतो. (कारण बहिणीची बदललेली परिस्थिती) स्वतःच्या शेजारी तिचे पान मांडतो..मग ती पाटावर आपली शालजोडी काढून ठेवते, भावाला वाटते उकडत असेल म्हणून काढली असेल, मग ती आपले दागिने काढून पाटावर ठेवते. भावाला वाटते जड झाले असतील म्हणून काढत असेल..पण त्या नंतर ती एक एक पदार्थांचा घास वेगवेगळ्या दागिन्यांवर ठेवू लागते. भावाला सुरुवातीला समजत नाही तो म्हणतो ताई तू जेव की.. त्यावेळी ती त्याला म्हणते माझे जेवण मी सहस्त्र भोजनाच्या दिवशीच जेवले आज जिला तू (लक्ष्मीला) जेवायला बोलावले आहेस तिला मी भरवत आहे..हे ऐकून भावाला आपली चूक उमगते तो तिची क्षमा मागतो आणि ती दोघेजण जेवतात.. दुसरे दिवशी तो ही तिच्या घरी जेवायला जातो. ती मनातली अढी काढून टाकते..जशी देवी तिला प्रसन्न झाली तशी तुम्हां आम्हां होवो ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुपर संपूर्ण..

ही कहाणी मला खूप आवडते याची खूप कारणे आहेत.. शेजारणीने तिला सांगितलेले साधे सोपे नियमित करायचे व्रत.. फुटाणे, दूध तिच्या परिस्थितीतही सहज दुसरीला देता येण्यासारखे.. परत भाजके खाणे पावसाळ्यात गरजेचे..आणि आपल्या घासातला घास दुसऱ्याला देऊन मग आपण खावा ही त्या मागची भावना मला खूप भावते.




सहस्त्र भोजनाच्या दिवशी मुलांना घेऊन जेवायला जाणे या मागे एका आईची अत्यंत अगतिकता दिसते..काळ बदलला तरी आई तीच असते आपल्या मुलांसाठी मूकपणे अपमान सोसणारी..

पण स्वतः समर्थ झाल्यावर स्वाभिमान जपणारी.. कारण कहाणीत पुढे ती भावाच्या घरी जेवायला जाते तिथे कुठेही मुलांचा उल्लेख नाही..

या कहाणीत सूडबुद्धी नाही उलट चुकलेल्या भावाला त्याची चूक दाखवून ती योग्य मार्गावर आणते. या मध्ये तो भाऊही आपली चूक नम्रपणे, क्षमा मागून सुधारतो हे खूप

शिकण्यासारखे आहे.. कळत नकळत चूक झाली तर ती मान्य केली पाहिजे आणि आपल्यात सुधारणा केली पाहिजे हे या मुळे उमगते.

व्रत म्हणजे काय तर एखादा नियम.. आताच्या काळातही नियमितपणे केलेला एखाद्या नियमामुळे आपले आरोग्य, विचार, परिस्थिती बदलू शकते.. आपल्याकडे एक अष्टलक्ष्मीचे एक स्तोत्र आहे..त्यात तिची रूपे वर्णिली आहेत.. त्या कुठल्याही रूपात तिचे प्रसन्न होणे घ्यावे तिला जशी देवी प्रसन्न झाली या अर्थात केवळ धन या अर्थाने घेऊ नये.. तर त्या प्रसन्न होण्या मागला गर्भितार्थ समजून घ्यावा.. आणि तिने जसे भावाला समजून घेतले तसे आपण आपल्या लोकांना आपला स्वाभिमान, श्रद्धा, विश्वास आणि या व्रता मागचा उद्देश जपत समजून घ्यावे असे मला वाटते..









## इंदापूरी निखारे

### किमान एक तरी रोपटे.....



ज्योतिर्मय साहित्य

जागतिक पर्यावरण दिवस !
जागतिक मैत्री दिवस !
जागतिक मदर डे !
जागतिक फादर डे !
जागतिक अमुक डे !
जागतिक तमुक डे !
पार नुसते भारदस्त नाव ऐकूनच भारून जातो...
असाच एखादा जागतिक दिवस... शहरातील उच्चशिक्षित,
मान्यवर पर्यावरण प्रेमी , जाणकार...
तरुण, तरुणी आणि असे बरेच... मीडिया, पत्रकार...
गावात जोरदार स्वागत... मान्यवर व इतर भाषण...
फेटे, टाळ्या आणि आनंदी आनंद...
वृक्षारोपण समारंभास सज्ज
खड्डे खणले, रोपटे पेरले, पाणी दिले...
मस्त सेल्फी घेतल्या...
आणि आपापल्या ग्रुपवर सेंड केल्या...
काहींनी रील पण केल्या...
अतिउत्साही पत्रकार, मीडिया...
हे काहीतरी ब्रेकिंग दाखवल्याशिवाय स्वस्थ रहात नाही...
या सगळ्या समारंभापासून थोडा दूर...
एका तीक्ष्ण नजर असलेल्या पत्रकारला दिसला...
मनात आनंदून गेला... एव्हढेच नाहीतर गाणे पण आले
मनात... दिसला ग बाई दिसला!
आणि धावत पळत...
त्या कोपऱ्यात उभ्या असलेल्या शेतकऱ्यांकडे...
भाऊ आपल्याला काय वाटते?
भाऊ म्हणाला खूप खूप आनंद झाला...
आपण सगळे एक दिवस तरी गावात आले...
सगळी झाडे तोडून टाकली...
किती आनंदात त्याचे दुःख तुम्हाला झालेले !
स्पष्ट दिसते!
पण किमान एक रोपटे तरी चांगले लावा...
ते चांगले मोठे होऊ दे...
त्याची मुळे चांगली पक्की रुजतील अशी झाडे लावायला हवी...
त्याच्या फांद्या पण दणकट होतील अश्या...
त्याची काळजी पण मीच घेईल...
आत्ता मला काही त्रास नाही...
पण मुले २५/३० वर्षांची होतील ना !
तेव्हा ते झाड कामाला येईल...
या सगळ्या रोपट्यात...
निदान ते एक झाड तरी तसे चांगले लावा...
आत्महत्त्या अगदी व्यवस्थित करता येतील असे...

# पोशिंदा



ज्योतिर्मय साहित्य

...आणि सहज म्हणून नकळत मागच्याच आठवड्यात तिथे जाणे झाले. आषाढाच्या सरींची रिप रिप चालूच होती. गावातील जुन मातीच घर मागच्या सात आठ वर्षात हळूहळू पडत होतच आणि शेवटी गेल्या सहा महिन्यात ते जमिन दोस्त झालं.

त्या तिथे असणारी ती दिंडी ( दिंडी म्हणजे आमच्याकडे दोन घरांच्यामध्ये असणारी छोटी चौकट जिथून अगदी वाकून यावे लागते.) अन् तिथली ती लाकडी चौकट त्यावर असणारी ती रुपयाच्या आकाराची पितळी फुले अन् खाली लोंबकळणारी कडी हलू लागली. अन् स्मरण वाटेवर घेऊन गेली. त्यापुढेच असणारी माजघराची चौकट सहज म्हणून नकळत लक्ष गेले, ती गाऱ्याच्या मातीत बुडालेली तुळवीच्या खालची खुंटी अन् त्या खुंटीवर अडकवलेल्या त्या बैलांच्या जू वरच्या खिळा खिळ्यांच्या म्हणजे बैलाच्या जू ला लावायचे खिळे अन् त्यासोबत असणारा तो खळखळ वाजणारा तांबूस भुरा कातडी पट्टा अन् त्यावरची ती घुंगरे नकळत कानाशी वाजू लागली. अन् तीस वर्षापूर्वीची ती दुपार सहज नजरेत आली.हिरवी अन् लाल रिबीन या इथेच याच्या बाजूच्या खुटीवर लोंबकळत असायची.ती डोळ्यासमोर आली.

स्मरणे ती स्मरतात,मन तरंग
होऊन,आठवणींच्या झुल्यावरी झुलतात.
उसळणाऱ्या लाटांच्या थेंबाथेंबातूनी
मन चिंब चिंब भिजवतात.
अन् हळव्या क्षणांतल्या ते दोन
थेंब...पुन्हा सागरी त्या बुडतात.

एक जुलै महाराष्ट्र कृषी दिन परवा असे अनेक विविध रूपात काढलेले अगदी सुंदर हिरव्यागार शेतात छान नैसर्गिक फोटो काढून त्याच्या बद्दल सुंदर चार ओळी लिहून त्याच्या प्रति आपले कर्तव्य मानण्यात धन्यता मानणारे आपणच का..? आणि विचार आला.

अरे ! त्याच शेतात रात्री दारी धरायला जाणारा शेतकरी त्याच शेतात पाय ठेवून कधी पाहिलं आहे का हो..! आणि कधी कोणी पाहिलं असेलही नाही अस नाहीच म्हणत आहे. मला फक्त एवढेच म्हणायचे आहे की असणं आणि दिसणं यामध्ये खूप फरक आहे हो.

ठिक हे ही मान्य आहे की लिहायला काय जातं. पण खरं सांगू का लिहता लिहिताच हा विचार डोक्यात आला. सर्वांनीच मातीत पाय ठेवायला नाही बोलत आहे. आणि ते शक्य ही नाही. पण दुसऱ्या मार्गाने तरी आपण काहीतरी प्रयत्न करू शकतो ना! किंवा त्याच्या प्रति असलेले कर्तव्य आपण पार पाडू शकतो . असा मनात विचार येऊन गेला.

१ जुलै कृषी दिन झाल्यानंतर किंवा त्याच्या थोड्याच दिवसाच्या आसपास येतो तो बेंदूर काही भागात तो श्रावणी पोळा म्हणून साजरा करतात तर काही ठिकाणी आषाढ पोळा म्हणून साजरा होतो.

मुळाचा सण बेंदूर सणापासून सणांना सुरुवात होत असल्यामुळे आमच्याकडे आमच्या घरातील वयोवृद्ध माणसे बोलायची, मुळाचा सण.

आकीती सणाची निचिती अन बेंदूर सणांचा लेंडुर अशी प्रचलित म्हण आहे. थोडक्यात काय,तिथून पुढे अनेक सण व्रत वैकल्ये सुरू होत होते म्हणून असे बोलले जायचे.

बी बिवडं,''आर कुठल बियान आणल.'' ''महाबीजच ''तसेच युरिया सल्फेट हे आणि असे अनेक शब्द ...!! आज या शब्दांची भ्रांत पडू लागली असे वाटत राहते.

कोवळया कोवळया तृणाने फुललेले शिवार आणि शिवारात जिकडे तिकडे बैलांच्या घुंगरांचा अन् अ... सर्जा य.. अ..संज्या.. ऐ आवाजानी घुमलेल ते शिवार मनाला खूप आनंद देत असायच पण आज अशी शिवारं पहायला मिळत नाहीत . नाही अस नाही पण तुलनेत खूपच कमी पहायला मिळते.शेती आजही आहे तिथेच आहे. पण कुठेतरी काहीतरी सलत राहते. असं मला वाटतं असो ! काळाबरोबर चालणे हिच काळाची गरज आहे.

आज खूप दिवसानी आठवलं त्याच बळीराजाची साथ देणाऱ्या बैलाची कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक सण म्हणजे बैलपोळा. मला आजही आठवतेय. बैलपोळ्याच्या अगोदर काही दिवस अगोदरच शेतातील पेरणी झालेली असायची. अर्थात कधी मागे पुढेही व्हायची. पावसाच्या आगमनावर अवलंबून असायची.आषाढाची रिपरिप चालू असायची. ओढे नदी नाले भरुन वाहत असायचे. थकलेल्या शरीराला अन् मनाला नव्याने उभारी देत बैलपोळा सण यायचा. बैलपोळ्याच्या आदल्या दिवशी ते छोटे छोटे बैल पाटावर मांडून ठेवायचे. इकडे गोठ्यातील बैलाना नदी ओढ्यावरुन धुवून स्वच्छ करुन घरी आणून प्रेमाने त्याला गरम पाण्याने ही आंघोळ घातली जायची. सायंकाळच्या वेळी हळद आणि गोडेतेल गरम करुन त्याची मालिश केली जायची.आणि ज्याच्यांकडे बैल नाहीत त्यानी घरातील मातीच्या बैलांची खांदे मळणी अर्थात वशिंड आणि शिंगांच्या मध्ये जबाबदारीच जू




पेलले जाते त्या बैलाच्या पाठीवरचा उंच भाग म्हणजे वशिंड आणि शिंगे दोहोंच्या मधला त्या खोलगट भागाची तेल आणि हळदीने मालिश अर्थात खांदे मळणी करायची. शिंगामध्ये कडबोळी (गहू नि हरभरा डाळीच्या पीठाचा एक गोलाकार गोड पदार्थ) घालायची. संध्याकाळी बाजरीच्या कण्या घुगऱ्यांचा नैवेद्य द्यायचा.

दुसऱ्या दिवशी रंगाचा हिंगळाचा डबा आणून शिंगाना रंग लावायचा. बेगड पट्ट्या अंगावर रंगबिरंगी रंगानी लाकडी छापानी वेगवेगळे रंगाचे छाप उठावयचे. कपाळावर रंगीत बाशिंग शिंगात पितळेच्या गोंड्याच्या शेंब्या,घुंगरु चाळ, रंगीत मण्यांची माळ, पितळी तोडे,घुंगराचे चाळ , कवड्याची माळ, म्होरकी, वेसन, गुढग्याचे गंडे, शिंगदोर पितळेचे तोडे, रंगीत कासरा, अंगावर टाकण्यासाठी झूल , रंगीबिरंगी रिबीन, कंबरपट्टा पायांचा पट्टा, तसेच वाकाचे गोंडे गळ्यात घातले जायचे. हे एवढ्याच साठी आता या वस्तू काळाच्या ओघात मागे पडत गेल्या आहेत. इत्यादी वस्तूनी बैलाची सजावट करायची.

बैलपोळाच्या दिवशी पुरणपोळीचा स्वयंपाक करायचा. त्यावेळी प्रत्येक शेताला वाड्या द्यावयाच्या. वाड्या म्हणजे पुरणपोळीचा छोटा नैवेद्य, शेतात घेवून जायचे.शक्यतो आषाढाच्या रिपरिपच्या अगोदर पेरणी झालेली असायची.आणि शक्यतो पाऊस जास्त झाल्यामुळे पीक पाहणी होत नसे.वाड्या घेऊन जाणे हे फक्त निमित्त त्या निमित्ताने प्रत्येक शेताला नैवेद्य द्यायचा.पीक पाहणी करणे हे त्यामागचे कारण असावे बहुदा.किती विचारपूर्वक आपल्या सणांच्या काही रुढी परंपरा आहेत.म्हणजे त्याला काही तरी पूरक अशी कारणे आहेत. बेंदूर सण दिवशी घरच्या घर धनीनी बैल देवाला जायच्या अगोदर त्यांची पूजा करायची. आणि वाजत गाजत गावातून मिरवणूक काढायची. देवळात जावून देवाच्या सभोवताली फिरून येऊन देवळातील अंगारा लावयचा. इथे अंधश्रद्धा हा विषय नाही.पण त्यामागची भोळी माया यावरुन शेतकऱ्याच्या पशुधनाची कृतज्ञता दिसून येते.

घरी आल्यानंतर घरातील गृहिणी त्याची घास मुटका टाकून त्याची दृष्ट काढायची.

अशा पद्धतीने बैलपोळा सण साजरा व्हायचा. त्याच्या कृतज्ञतेची भावनेचे एक उदाहरण म्हणजे काही शेतकरी बैलाला मंदिरातून आणल्याशिवाय अन्नचा घास ही मोडत नाहीत. त्यावेळी वाटते हे फक्त एक शेतकरीच करू शकतो.

अलिकडे काही वर्षात बैलपोळ्याला बैलाऐवजी गावातून ट्रॅक्टरची हि मिरवणूक काढली जाते.मिरवणूक काढणे चुकीचे आहे असे नाही. पण हे पाहिल्यानंतर मन उद्विग्न होते. आधुनिकीकरण हवे आहेच. पण वाढत्या आधुनिकी करणात काही पारंपारीक गोष्टी मागे पडत चालल्या आहेत. हे विसरून कसे चालेल.मला यातून एक म्हणायचे की, पण ज्या पशुधनामुळे आपल्याला शेणखत मिळते. आणि फक्त शेणखत च का? दूध दुभते ही आलेच की जर हे पशुधन कमी होत गेले तर रासायनिक खतांमुळे होणारे तोटे आजकाल आपण प्रसार माध्यमांच्या माध्यमातून पाहतच आहोत. भेसळ युक्त दूध जमिनीचा पोत सुधारणा ऐवजी ते कमी कमी होत चालला आहे. यातील अजून खूप उदाहरणे आपण पाहू शकतो.मला यातून आधुनिक शेती करू नका असे अजिबात नाही म्हणायचे पण सारसार विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

कुठेतरी ऐकण्यात आले होते.भूत काळाच्या वेलीवर भविष्याची कळी फुलत असते. पुन्हा तोच मुद्दा, बोलणे सोपे आहे पण ...?

हे पाहिल्यानंतर म्हणजे पहिला मुद्दा येतो शेती करायची कोणी,कशी, त्यामागची अनेक कारणे आहेत. याचा हा मुद्दा नाही की आधुनिक शेती करू नये. हा ही खूप मोठा प्रश्न आहे. पण सुरुवात तर व्हायला हवी. अर्थात त्याला निसर्गाची आजूबाजूच्या वातावरणाची साथ हि हवीच. माफ करा कोणाच्या भावना दुखावयच्या नाहीत. पण कधीतरी एखादी गोष्ट मनाला स्पर्शून जाते. पण यातून आपण सकारात्मक विचार का करू नये. आणि याच भावनेतून झालेलं हे बैल पोळ्या विषयाचे लेखन.

असो !आता मूळ मुद्याकडे जाऊया. एवढ्या या साऱ्या अडिअडचणीत हि आपले पाय त्या मातीत घट्ट रोवून राहणारा माझा बळीराजा खऱ्या अर्थाने राजा आहे.याचा प्रत्यय येतो.

# गोष्ट गुरुपौर्णिमेची

ज्योतिर्मय साहित्य

गेल्याच महिन्यात आपण सर्वांनी गुरुपौर्णिमा साजरी केली. आपल्याला ज्ञानाचा प्रकाश दाखवणा-या गुरुप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस. गुरु शिष्यापेक्षा वयाने अनुभवाने मोठाच असला पाहिजे असं काहीच नाही. अजाणत्या वयातील आपल्याच मुलांकडून आपण खूप काही शिकतो. अगदी जीवनातील सगळ्यात मोठा धडाही आपण आपल्या मुलांकडून शिकतो.

अनेक छोट्या छोट्या गोष्टी आपण मोठेपणी विसरतो, पण मुलं त्या आपल्याला पुन्हा शिकवतात. म्हणूनच संत तुकाराम महाराजांनी म्हटलंय,

''आधी विनय करावा। मग गुरू शोधावा।।'' कधी कधी तो गुरू आपल्या आजूबाजूला, अगदी आपल्या पोटच्या मुलांमध्येही असतो! हो ना? गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने मला स्मरण झालंय आमच्या वैष्णवीच्या एका स्पर्धेचं.

गुरुपौर्णिमेनिमित्त तिच्या शाळेत आयोजित केलेल्या कथाकथन स्पर्धेत गुरुशिष्यांची एक गोष्ट सांगायची होती. अरुणी आणि धौम्य ऋषींची गोष्ट वैष्णवी खूप रंगवून अगदी साभिनय सांगायची. तिच्याकडून गोष्ट ऐकताना आमची ब्रम्हानंदी टाळी लागायची. गोष्ट सांगत असताना तिला बघणं हे आमच्यासाठी जगातलं सर्वांत मोठं सुख होतं. शिक्षकांनाही तिचे कथाकथन आवडले असेल म्हणूनच मग शाळेतील शिक्षकांनी पण हाच सल्ला दिला की तीच गोष्ट तिने स्पर्धेत सांगावी. झालं. तालमी सुरू झाल्या. दिसागणिक गोष्टीतली रंगत वाढू लागली. जिल्हा पातळीवरील स्पर्धेत आमचा सहभाग आणि प्रथम क्रमांकही जवळजवळ निश्चित झाला, असं वाटलं. स्पर्धेचा दिवस उजाडला. भल्या सकाळी हातावर दही साखर घेऊन आमची ही स्पर्धक ऐटीत शाळेत निघाली. आठनऊ वर्षांची आपली पोर आता स्पर्धा गाजवणार आणि आपण पाहिलेल्या स्वप्नांना मूर्त स्वरूप येणार या धुंदीत अगदी रस्त्यावर चालतानाही मी तिच्याकडून सराव म्हणून गोष्ट म्हणवून घेतली. शाळेच्या गेटजवळ आल्यावर तिच्या गालावरुन हात फिरवत बोटं कडकडा मोडली. नजरेने दृष्ट काढली आणि योद्धा रणांगणावर उतरला.



आता शाळा सुटण्याची वाट मी पाहू लागले. पण त्याआधीच शिक्षकांचा फोन आला. ते म्हणे, काय हो? तुमची मुलगी म्हणजे नावाजल्या म्हशीला टोणगा अशी गत झालीय. अरुणी आणि धौम्य ऋषींची गोष्ट सांगणार होती ना ती? मग ही कुठली भलतीच गोष्ट तिनं सांगितली? तुम्ही तिला सांगितलं नव्हतं का नीट? मला धक्काच बसला. मी काही बोलूच शकले नाही. तिला शाळेतून घरी आणलं. तिच्याशी कसं बोलावं, हेच कळत नव्हतं. थोडी रिलॅक्स झाल्यावर तिनेच विषय सुरू केला. ''आई, आज मी सांगितलेली गोष्ट माझ्या मैत्रिणीला खूप आवडली. सगळ्यांनी खूप टाळ्या वाजवल्या '' मी विचारलं, ''कोणती गं गोष्ट सांगितलीस तू?'' तिचं उत्तर तयारच होतं, '' मी स्वतःच एक माझी गोष्ट तयार केली त्या गोष्टीतला मुलगा ना एकदम हुशार वगैरे नव्हताच बरं का आई. तो सगळं स्वतःच्या मनात येईल तसंच वागणारा होता, मग शाळेत शिक्षक आणि घरी आई बाबा त्याला मारायचे असा मुलगा'' तिला मध्येच थांबवत मी विचारलं, ''अशा मुलांची गोष्ट कशी असू शकेल गं? गोष्टीतली मुलं हुशार आणि आज्ञाधारक अशीच असतात ना?.''




पण तिनं नाक मुरडत लगेचच सांगितलं,''माझ्या गोष्टीतला मुलगा मला पाहिजे तसाच असणार ना?'' मी गांगरले. तिच्या प्रश्नाचं उत्तर माझ्याकडे त्याक्षणी तरी नव्हतं . मी दबकतच म्हटलं, ''आणि मग अरुणीची गोष्ट?'' ती म्हणाली, ''ती गोष्ट मी नंतर कधीतरी सांगेन गं आई. जी गोष्ट मला आवडते तीच मी सांगणार ना? तुमच्या सगळ्यांच्या आवडीची गोष्ट मी का बरं सांगू?'' तिचं बोलणं, तिचे विचार, भावना सगळंच कसं पारदर्शक होतं. तिचा मुद्दा योग्य होता पण मग स्पर्धा, स्पर्धेसाठी दिलेला विषय यालाही महत्व आहे, हे मी तिला कसं सांगणार होते? मलाच संभ्रमात टाकणारी माझी मुलगीच त्याक्षणी माझी गुरु झाली.

ती गोष्ट 'स्पर्धेसाठी ठरवून दिलेल्या विषयावरची नव्हतीच हे खरं. स्पर्धेच्या दृष्टीने तिचा निर्णय 'चुकीचा' होता. पण तिच्या भावविश्वात तिनं तिच्या स्वतंत्र विचारांची झेप घेतली होती. कुठल्याही गोष्टीत पात्रं 'हुशार', 'आज्ञाधारक', 'आदर्श' असावीत असा आपला ठोकताळा ती मोडून टाकत होती. तिला गोष्टीत 'आपलं' असं खास काही हवं होतं वास्तवाशी, अनुभवांशी जुळणारं.

वैष्णवीच्या कृतीतून मला एक फार मोठा बोध मिळाला. गोष्ट म्हणजे फक्त मनोरंजन नाही, ती स्वतःला अभिव्यक्त करण्याचं माध्यम असते. बालमन स्वतंत्र विचार करतं, मूल्य ठरवतं, पात्रं उभी करतं आणि त्यातून त्यांना समज येते, आत्मभान मिळतं.

तिच्या गोष्टीतील मुलगा 'हुशार' नव्हता याचं मला फार नवल वाटत होतं अजूनही वाटतं. , पण खरं तर तोच आपल्यासारखा होता. चुका करणारा, मनात येईल तसंच वागणारा, शिस्तीचं पालन करत नाही असा. आपल्याला सुद्धा लहानपणी वाटलं नसेल का ? आपल्या गोष्टी आपण लिहाव्यात? कोणीतरी आपणावर गोष्टी लादल्या नाहीत का?मला खूपदा असं वाटायचं याचं स्मरण मला झालं. पण मी असा प्रवाहाविरुद्ध वाहण्याचा प्रयत्न कधीच केला नव्हता. त्यामुळे सुरुवातीला मला ते तिचं गैरवर्तन वाटलं. मी तिच्या अशा 'गैरवर्तनाचं' स्पष्टीकरण करायला सुरुवात केली होती. पण तिचं वर्तन चुकीचं नव्हतंच. तिनं स्वतःचा मार्ग निवडला होता. ना स्पर्धेची भीती होती ना बक्षिसाची लालसा. तिचा स्वतःचा निर्णय, स्वतःची कथा. याचे परिणाम काय होतील, आई काय म्हणेल, शिक्षक रागावतील का अशा सगळ्या नकारात्मक विचारांना तिने दूर ठेवलं होतं आणि लख्ख प्रकाशाची वाट निवडली होती. जे मला कधीही जमलं नव्हतं खरंतर असा कधी मी विचारच केलेला नव्हता. ज्या विचारापर्यंत मी पोचलेली नव्हते तो विचार तिनं अमलात आणला होता आणि आपण खूप वेगळं केलंय याची पुसटशी कल्पनाही नव्हती तिला. काही घडलंच नाही अशा आविर्भावात ती खेळायला निघून गेलीसुद्धा. मला त्या दिवशी समजलं आपली मुलं देखील आपले गुरु असतात. त्यांच्याकडून आपण 'शिकण्याचं' धाडस ठेवायला हवं. गुरुपौर्णिमेचा खरा अर्थ तेव्हाच उमगला . ज्याच्यामुळे आपलं विचारविश्व ढवळून निघतं, आपण आत डोकावतो, आपले ठाम समज पुसले जातात, गैरसमज दूर होतात तोच खरा गुरु.

स्पर्धेच्या निकषांनुसार बघितलं, तर वैष्णवी स्पर्धा हरली होती. पण जगण्याच्या स्पर्धेत तिनं एक मोठा टप्पा पार केला होता . स्वतःचं म्हणणं प्रामाणिकपणे मांडण्याचा. अनेकदा आपण पालक आहोत, शिक्षक आहोत म्हणून 'गुरु' असतो, असं गृहित धरतो. पण कधी शिष्यही आपल्याला शिकवून जातो. जीवन, प्रामाणिकपणा, सर्जनशीलता, आणि स्वाभिमान यांचे धडे देतो. गुरुपौर्णिमेच्या दिवशी वैष्णवी माझी गुरु झाली होती. आणि मी तिला पुन्हा एकदा विनम्रतेने, मनापासून वंदन केलं.

# 'श्यामची आई'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार

## ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा




ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली** – केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने आज ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार २०२३ ची घोषणा केली. यामध्ये सुजय डहाके दिग्दर्शित 'श्यामची आई' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट पुरस्कार जाहीर झाला आहे. तर, आशिष बेंडे दिग्दर्शित मराठी चित्रपट 'आत्मपॅम्फलेट' तसेच 'नाळ २' चित्रपटाला स्वर्ण कमळ पुरस्कार घोषित झाला आहे.

सर्वोत्कृष्ट बाल कलाकार पुरस्कार जिप्सी या चित्रपटातील बाल कलाकार कबीर खंदारे तर त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव जगताप यांना संयुक्तपणे नाळ २ चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला आहे.

यावेळी ४० फीचर चित्रपट पुरस्कार, १५ नॉन-फीचर पुरस्कार आणि १ चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. फीचर चित्रपट पुरस्कार निवडीच्या ज्युरीचे नेतृत्व आशुतोष गोवारीकर, नॉन-फीचर ज्युरीचे नेतृत्व पी. शेषाद्री आणि चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन ज्युरीचे नेतृत्व गोपाळकृष्ण पै यांनी केले. २०२३ वर्षामधील राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार फीचर, नॉन फीचर आणि चित्रपटांवरील सर्वोत्कृष्ट लेखन अशा तीन विभागांमध्ये जाहीर करण्यात आले. हे पुरस्कार लवकरच प्रदान केले जाणार आहेत.

**सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि अभिनेत्री पुरस्कार**

हिंदी चित्रपट १२ वी फेलला सर्वोत्कृष्ट फीचर चित्रपट पुरस्कार जाहीर झाला. जवान चित्रपटासाठी शाहरुख खान आणि '१२ वी फेल'साठी विक्रांत मेस्सी यांना संयुक्तपणे 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' पुरस्कार जाहीर झाला. राणी मुखर्जीला 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार' जाहीर करण्यात आला.

**'आत्मपॅम्फलेट'साठी आशिष भेंडे यांना पुरस्कार**

दिग्दर्शकाचा सर्वोत्कृष्ट पदार्पणाचा चित्रपट पुरस्कार दिग्दर्शक आशिष भेंडे यांना आत्मपॅम्फलेट या मराठी चित्रपटासाठी जाहीर करण्यात आला.

**राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट**

सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट कटहल- अ जॅकफ्रुट मिसरी, सर्वोत्कृष्ट अभिनेता- शाहरुख खान आणि विक्रांत मेस्सी, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री- राणी मुखर्जी, सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक सुदिप्तो सेन, द केरला स्टोरी, सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री उर्वशी, उलोझुक्कु, सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता विजयराघवन आणि मुथुपेट्टई सोमू भास्कर, राष्ट्रीय, सामाजिक आणि पर्यावरणीय मूल्यांना प्रोत्साहन देणारा सर्वोत्कृष्ट चित्रपट सॅम बहादुर या चित्रपटास पुरस्कार घोषित करण्यात आला.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559